चांगचा कागदी घोडा



लेखक : एलेनॉर

चांगचा कागदी घोडा

मराठी : अश्विनी बर्वे



चांग आपल्या आजोबांबरोबर गोल्ड डिच हॉटेलच्या स्वयंपाक घरात बटाट्याची सालं काढत होता. अचानक चांग थांबला. “मला घोड्याचा आवाज येतोय.” तो ओरडला. मग तो धावत दरवाज्याकडे गेला.

“जर माझ्याजवळ एक घोडा असता तर,” तो लाई आजोबांना म्हणाला. “मग मला असं एकटं वाटलं नसतं.” “पुढच्या वर्षी खाण कामगार आपल्या कुटुंबासहित इथं इएतील तेव्हा तुला एकटं वाटणार नाही.” पण त्यांच्या उत्तराने चांगला स्वस्थ वाटलं नाही.त्याला तो दिवस स्वच्छ आठवत होता जेव्हा तो आणि त्याचे आजोबा सॅन फ्रान्स्सिकोला आले होते. त्यादिवशी काही लोकांनी त्यांच्यावर दगड फेकल्याचे त्याला चांगलं आठवत होतं.

“अमेरिकी मुलं आपला तिरस्कार करतात,” चांग म्हणाला. लाई आजोबांनी आपलं डोकं हलवलं आणि म्हटलं, “ते आपला तिरस्कार करत नाही,” ते पुढं म्हणाले, “ते लोक आपल्याला जाणतच नाही,”

“ जर माझ्याजवळ एक खेचर असतं तर खरंच माझ्याजवळ एक मित्र असता,” चांग म्हणाला. लाई आजोबा हसले. “आता तर तुझे काही मित्र तर आहेच ना,” ते म्हणाले, “तुझे शिक्षक, नंतर न्हावी, लोहार, आणि मोठ्या पीटला विसरू नकोस हं.”

“पण ते माझ्यापेक्षा वयाने खूप मोठे आहेत,” चांग म्हणाला.

“जर छोटा घोडा असता तर त्याच्या बरोबर खेळण्यात मजा आली असती.”

लाई आजोबांनी चुलीच्या वर लावलेल्या पेंटिंगकडे बोट दाखवत म्हटलं, “बघ त्या घोड्याच्या पेंटिंगकडे, आता आपली या चित्राकडे बघण्याचीच फक्त कुवत आहे.” ते म्हणाले, “आता पटापट बटाटे सोल लवकरच भुकेले खाण मजूर येतील माझं स्वादिष्ट अन्न खायला.”

चांगने आजोबांनी सांगितल्यानुसार केलं. त्याने खाण्याचं टेबल सुद्धा सजवलं. त्याने विहिरीतून पाणी आणलं, चुलीसाठी लाकडं आणली.

पण त्याच्या डोक्यात एकच गोष्ट फिरत होती, ती म्हणजे जर त्याच्याकडे खेचर असतं तर.

संकट

काही मजदूर असभ्य होते, ते चांगची वेणी ओढत, चांग आपल्या वेणीला त्यांच्या पासून लांब राखण्याचा प्रयत्न करत असे.



तो लोकांशी नेहमी आदराने बोले, जेव्हा कोणी खाण कामगार त्याला नाव विचारे, तेव्हा चांग खूप अदबीने वाके आणि सांगे “महाराज माझं नाव चांग आहे.”

एक खाण कामगार आपल्या गुडघ्यावर हात मारत म्हणाला, “यामुळे तुझ्या डोळ्याचं बुबुळ मोठं झालं का?” तो ओरडत म्हणाला. त्यामुळे तिथं असलेले कामगार जोरात हसू लागले.

चांग धावत स्वयंपाक घरात आला, “म्हणून मला चीनला परत जावं वाटतं,” तो म्हणाला. लाई आजोबांनी त्याला जवळ घेतलं.

"चांग तुला माहीत आहे आपण परत जावू शकत नाही. लाई आजोबा म्हणाले. “चीन मध्ये यावेळी युद्ध चालू आहे.” “मग ते खाण कामगार एवढे असभ्य का?” चांगने विचारलं. लाई आजोबांनी दीर्घ श्वास घेतला. “ते आपलं हृदय आपल्या घरी सोडून आले आहेत. आता ते फक्त चमकणाऱ्या सोन्याबद्दल विचार करतात. इथं सगळ्यांना सोन्याचा ताप चढला आहे. त्यामुळे लोक वेडे झाले आहेत.”

मग तो मुख्य रस्त्यावर अभ्यासासाठी गेला. रस्त्यात चांग काहीवेळ अस्तबल घोड्यांना पहाण्यासाठी थांबला. “जेव्हा माझ्याजवळ एक खेचर असेल तेव्हाही मी इथं असेच थांबेन.”

जेवण झाल्यावर चांगने एका मोठ्या टबात अंघोळ केली. मग आपली वेणी घातली आणि स्वच्छ धुतलेले कपडे घातले.

टीचर सी-यौ, चांगला इंग्रजी लिहायला आणि वाचायला शिकवत होते. चांगला ते अजिबात आवडायचे नाही.

त्याला इंग्रजी अक्षरे किड्या-मुंग्यांसारखी कागदावर ओरडत आहेत असे दिसे.

बाळ

माणूस

पहाड़

घोड़ा

चांगला चीनी शब्द टोकदार ब्रशने आणि काळ्या शाईने रंगवण्यात आनंद मिळे.चिनी भाषेत प्रत्येक शब्द एका चित्रासारखा दिसतो.

tsu – बाळ , jen - माणूस , shan - पहाड़.

जेव्हा तो ma - घोड़्यावर आला, तेव्हा चांग, दिवसा स्वप्न बघू लागला.

लगेच टीचर सी-यौ ने
छड़ीने चागच्या पाठीवर मारलं.
“जर तू अशाप्रकारे खेळणं
सोडलं नाही, तर तू रिकाम्या
डोक्याचा होशील, तू कोणत्याच
कामाचा राहणार नाही.”हे ऐकून
चांगने आपली थुंकी गिळली.
त्याला रिकामा डबा होण्यात
काहीच दुःख नव्हते. त्याला
फक्त एक खेचर हवे होते.

त्यादिवशी रात्री चांगने आपल्या उशीला असं जवळ घेतलं की जसं ते त्याचं खेचरच आहे. त्याला वाटत होतं की तो त्याच्या खेचरावर मऊ नाक घासत आहे आणि त्याचा श्वास ऐकत आहे.

बिग पीट

जेव्हा बिग पीट गोल्ड डिच हॉटेल मध्ये आला तेव्हा कुठे चांगला चांगलं वाटलं. चांगने पीट इतकाउंच आणि ताकदवान माणूस कधी पाहिला नव्हता. पीटने छोट्या चांगची कधी वेणी ओढली नाही की कधी त्याला चिडवलं नाही.

आता गोल्ड डिच हॉटेल मध्ये
खूप गर्दी झाली होती.

तिथं रोज अधिकचे खाण
कामगार येवू लागले.

ते पहाडामधून सोन्याचा कच्चा माल खोदून घेवून येत आणि मग नदीमध्ये साफ करत.

एक दिवस बिग पीटने चांगला
सोन्याचे काही छोटे तुकडे दाखवले.

ते बिग पीटच्या तराजू वर
सोन्याचे वजन करत, कितीतरी
वेळा सोन्याछोट्या तारा
जमिनीवर पडत. पण खाण
कामगारांना सोन्याच्या मोठ्या
तुकड्यांमध्ये रस होता..

मग चांगच्या डोक्यात एक आयडिया आली.” बिग पीट, तू मला सोनं शोधायला शिकवशील का?” त्याने विचारलं. “मला एक खेचर घेण्यासाठी सोनं हवं आहे.” बिग पीटने चांगकडे बघितले, “हे बघ खेचर खूप महाग असतं,” तो म्हणाला. “तुझे खूप उपकार होतील,” चांग म्हणाला. “मी तुझी केबिन साफ करेन.” हे ऐकून बिग पीट हसला. “जर तुझे आजोबा परवानगी देतील तर मी तुला उद्याच माझ्याबरोबर घेवून जाईन.”

चांग धावत गोल्ड डिच हॉटेलमध्ये गेला. “आजोबा कृपा करून मला जाऊ द्या,” चांगने आजोबांना विनंती केली. “ठीक आहे,” आजोबा म्हणाले “फक्त एकदाच” ते पुढे म्हणाले, “एखाद्यावेळेस तुझं नशीब उजाडून जाईन.”

मग बिग पीटने चांगला
आपल्या घोड्यावर बसवलं.
“हा-हा,” तो म्हणाला आणि
ते पुढे निघाले.

सोन्याचा शोध

दुसऱ्या दिवशी सकाळी-सकाळी
लाई आजोबांनी चांग आणि
बिग पीटचा डबा तयार करून
दिला. चांगने सोनं ठेवण्यासाठी
एक पिशवी घेतली होती.

पुढे जाऊन ते एका खड्डाजवळ पोहचले. तिथं बिग पीटने चांगला एक फावडं आणि बादली दिली. तिथं जमीन दगडासारखी कठीण होती.

बिग पीटने कुदळीने वरचा कठीण दगड फोडला. मग चांगने खालची माती फावड्याने भरली.

त्यानंतर बिग पीटने चांगला मातीतून सोनं साफ करून घेण्याचं तंत्र शिकवलं. त्याने काही माती परातीत टाकली.मग त्याने पाण्यात परात गोल –गोल फिरवली. जेव्हा माती धुवून निघाली. तेव्हा थोडी वाळू आणि खडे राहिले. पण त्यात सोन्याचे कण नव्हते.

चांगने खूप कष्ट घेतले. सूर्य तेजाने प्रकाशत होता. त्याच्या चेहऱ्यावरूनघाम वाहू लागला आणि त्याच्या हाताला फोड आले. “हळूहळू काम कर दोस्त,”

बिग पीट म्हणाला. पण चांग त्याच वेगाने काम करत राहिला. त्याला खेचर जे घ्यायचे होते.

अचानक, चांग ज़ोरात ओरडला!
“सोनं सापडलं!”

सोन्याचचे काही कण
परातीतल्या खड्या आणि वाळू
मध्ये चमकत होते. चांगने ते
लक्षपूर्वकं पिशवीत ठेवले.

मग चांग आणि बिग पीट घोड्यावर स्वार होऊन घाईने गोल्ड डिच हॉटेल मध्ये आले. “आता मी माझ्यासाठी खेचर घेवू शकतो,” चांग ओरडला.

चांगने आपला खजाना स्वयंपाक घराच्या टेबल वर पसरवला. बिग पीटने फुंकर मारून त्यातली सगळी वाळू उडवली.

जे उरलं होतं ते चांगने गोळा केलं, “एवढ्या सोन्यात तर एक छोटी बकरी सुद्धा येणार नाही.” तो निराश होत म्हणाला. “आता मी खेचर विकत घेवू शकणार नाही.”

सचमुच का टट्टू

सकाळी चांगने आपला शब्द पाळला. त्याने झाडू घेवून केबिन चांगली स्वच्छ केली.

अचानक त्याला फरशीच्या फटी मध्ये काहीतरी चमकणारे दिसले..

चांगने खाली वाकून बघितलं, “सोनं” तो कुजबुजत म्हणाला.

सोन्याचे ते तुकडे पिनेच्या टोका इतके मोठे होते. पण ते खूप होते.कदाचित त्यामुळे तो खेचर घेवू शकेल इतके होते. त्याने सोन्याच्या त्या तुकड्यांना आपल्या बादलीत ठेवले. मग तो धावत आजोबांकडे गेला, “आता मी नक्कीच खेचर घेवू शकेन,” चांग ओरडला.

“मला तर या गोष्टीचा अंदाज नव्हता, की माझ्या फरशीचा फटीत एवढं सोनं दाबलं गेलं आहे.”

लाई आजोबांनी चांग कडे करड्या नजरेने बघितले. “तुला सोनं बिग पीटला परत करावं लागेल.” ते म्हणाले. “कारण ते सोनं तुला त्यांच्या केबिन मध्ये मिळालं.” “हो मी तसंच करायला हवं,” चांग म्हणाला. “खेचर खरेदी करण्याचं स्वप्नं आता धुळीला मिळालं.”

बिग पीट ते सोनं घेवून बँकेत गेला.

एक दिवस दुपारच्या वेळी चांगला घोड्याच्या टांपाचा टप-टप आवाज ऐकू आला. “तो बिग पीटचा घोडा असेल,” लाई आजोबा म्हणाले. “मला माहीत आहे,” चांग म्हणाला. मग हळू हळू तो दरवाज्याकडे गेला.

चांगने खेचराचे चित्रं काढून टाकले आता त्याच्या स्वप्नावर पाणी पडले होते.

बिग पीट आपल्या घोड्यावरून येत होता. त्याच्या बरोबर एक सुंदर खेचर सुद्धा होते.

“हे खेचर बिलकुल तुझं आहे,” बिग पीट म्हणाला. “हे मी तुझ्या हिश्श्याच्या सोन्याने विकत घेतलं आहे.”

चांग ने मोठ्या प्रेमाने खेचराच्या ओल्या नाकाला कुरवाळलं. खेचराने सुद्धा चांगच्या बोटांना नाक घासलं आणि एक हळूवार आवाज काढला.

मग चांगच्या चेहऱ्यावर एक मोठं हसू पसरलं. “मला वाटतं, त्याला मी आवडलो आहे,” तो म्हणाला.

बिग पीटने चांगला खेचरावर बसवलं.

चांगला वाटलं की खुशीने तो मरून जाईन, “माझं स्वतःचं खेचर!” तो ओरडला. “मी त्याला पेंग्यो अशी हाक मारेन.” मग चांग वाकला आणि त्याने खेचराच्या कानात त्याचं नाव कुजबुजलं.

“माझं तुझ्यावर खूप प्रेम आहे पेंग्यो."

पेंग्योने हळूवार आवाज केला, जसं की त्याला चांगचं बोलणं समजलं होतं.

लेखक का नोट

चीन मध्ये युद्ध आणि क्रांती मुळे १८५० आणि १८६४च्या दरम्यान हजारो चिनी लोक अमेरिकेत आले. त्यातील अनेक लोकांनी "गोल्ड माउंटेन" मध्ये कमाई केली. त्यांनी कॅलिफ़ोर्नियाला हे नाव दिलं होतं.त्यातील खूप चिनी लोक सुतार, शेतकरी, इंजीनियर, शिक्षक आणि डॉक्टर्स होते. त्यातील कितीतरी जणांनी प्रथम रेल्वेचे रूळ टाकण्याचे काम केले. चिनी लोकांना अमेरिकेत कोणताच कायदेशीर अधिकार नव्हता म्हणून कधी कधी लोकांनी त्यांना क्रूर पद्धतीने वागवले.

बिग पीट सारखे अमेरिकी अधिकारी खाण कामगार नेहमी फरशीवर सोन्याचा चुरा सोडून जात असत. चिनी सफाई कामगार नेहमी तो चुरा स्वतःसाठी एकत्र करत असत. तसं पाहिलं तर चिनी लोकांनी अमेरिका आणि विशेष करून कॅलिफ़ोर्नियाच्या विकासात मोठं योगदान दिलं आहे. पण सुरुवातीच्या चिनी प्रवाशांमधले काहीच लोक अधिक धन मिळवू शकले.